**वरिष्ठ पोलीस निरीक्षक (प्रशासन), गु.प्र.शा. मुंबई**
यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर,
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१

महाराष्ट्र शासन

थेट दूरध्वनी :- +९१-२२-२२६९ १९१८

ई-मेल :- srip.cbadm@mahapolice.gov.in

**क्रमांक :- SR.P.I / ADM/ DCB/ 1439 /2021**

DATE : - 26 /10/2021

---

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :— पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये सुधारीत Best Detection of the Month August – 2021 'उत्कृष्ट गुन्हे शोध' प्रसिध्द करणेबाबत...

माहे ऑगस्ट—२०२१ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध )** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे.

**अ) माहे ऑगस्ट — २०२१ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ —**

१) **अंधेरी पोलीस ठाणे, परिमंडळ — १०,** गु.र.क्र. ९११/२०२१, कलम ३७९, ३९७, १२०(ब),३४ भा.दं.वि.

२) **मध्य विभाग, सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई** गु.र.क्र. १७/२०२१,कलम ४२०,४६५, ४७१,३४, १२०(ब) भादवि सह कलम ६६(अ), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम,

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/—
प्रभारी पोलीस निरीक्षक (प्रशासन),
गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई.

प्रत:—

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :—

दिनांक २०/१०/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **Best Detection of the Month** माहे ऑगस्ट—२०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (१) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट—२०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | अंधेरी पोलीस ठाणे, परिमंडळ— १० | गु.र.क्र. ९११/२०२१ कलम ३७९ ३९७, १२०(ब), ३४ भादंवि |

—: '' जबरी चोरी '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्री मधुकर दामोदर काविनकर, वय ४४ वर्षे हे दि. १९/०७/२०२१ रोजी १४.३० वाजताचे सुमारास एन बी गोल्ड, मुंबादेवी, मुंबई येथे अंदाजे ७७ नग, सोन्याचे बांगडया असलेली बॅग डिलिव्हरी करण्याकरीता दहिसर येथुन बस क्र. ४४० ने प्रवासाकरीता बसमध्ये बसले. प्रवासादरम्यान साधारणत: १५.३० वा. त्यांना झोपेने डुलकी लागली असताना नमुद बॅग बस मधील अनोळखी इसमाने त्यांचे नकळत चोरून पळुन गेला. तात्काळ फिर्यादी यांनी बस ड्रायव्हरला बस थांबविण्यासाठी सांगुन ते बॅग घेवुन जाणाऱ्या इसमाच्या मागे त्याला पकडण्यासाठी गेले. परंतू त्यातील एका पांढरा शर्ट घातलेल्या इसमाने शर्ट वर करून पिस्टल सारखे इत्यार दाखवले व '' हमारे पिछे आनेका नही '' असा दम भरला. व तेथून निघून गेले. म्हणुन फिर्यादी यांनी प्रत्यक्ष येऊन दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. मधुकर दामोदर काविनकर वय ४४ वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | लेदरचे बॅगमध्ये असलेल्या ७७ नग नक्षीकाम असलेल्या एक किलो वजनाच्या सोन्याचे बांगडया अंदाजे किमंत रूपये — ४६,५०,०००/— |
| हस्तगत माल | :— | १) २४ कॅरेटचे २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्कीट त्यामध्ये ५० गॅम वजनाचे दोन व १०० ग्रॅम वजनाचे एक बिस्कीट एकुण ०३ नग, एकुण किं. रू १०,५५,१२०/—<br>२) २४ कॅरेटचे ९५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्कीट एकुण किं. रू ०४,७४,०००/—<br>३)२४ कॅरेटचे ९० ग्रॅम वजनाचे पिवळया धातुचे सोन्याचे बिस्कीट सारखा तुकडा व दोन ग्रॅम वाजनाचा सोन्याचा पिवळया धातुचा खडा किं. रू ०४,५६,३२०/—<br>४) ९०.०२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्कीटाचा तुकडा, किं. रू ०४,४२,८९८<br>एकुण किं. रू २४,२८,३३८/— |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) महेंद्र लहु मोरे वय ४५ वर्षे,<br>२) मनोज कांतीलाल मेढे वय ३३ वर्षे,<br>३) आमीन मोहम्मद शेख वय ४९ वर्षे,<br>४) शशिकांत उर्फ बाबुभाई चंद्रकांत कोलवालकर, हिं., वय—६३ वर्ष,<br>५) विजयकुमार फुलचंद गुप्ता, हिं., वय ३८ वर्ष,<br>६) मनिष देवीलाल दर्जी वय ३४ वर्षे,<br>७) शैतानसिंग मोतीसिंग राजपुत वया ३८ वर्षे<br>दिनांक २९/०७/२०२१ रोजी |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हा दाखल होताच तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी फिर्यादीने यांनी ज्या ठिकाणी बस पकडली येथून पुढील प्रवासाच्या ब्ब्ज्ट थ्ववजंहम चा आढावा घेतला असता गुंदवली बसस्टॉप, अंधेरी पूर्व येथे बसमधून ०८ ते १० लोक उतरतांना दिसले. त्यापैकी काही संशयित घाई गडबडीत ऑटो रिक्षा पकडून तसेच काही संशयित इसम टॅक्सी पकडून पश्चिम द्रुतगती मार्गाने दक्षिण मुंबईच्या दिशेने जातांना दिसून आले.

सदरहू टॅक्सी व ऑटो रिक्षाबाबत CCTV Footage चे माध्यमातून मागोवा घेण्यात येवून त्यांचे नंबर प्राप्त करण्यात आले. ऑटो रिक्षा चालकांचा शोध घेवून तपास केला असता सदरचे वाहनातील संशयीताना साईधाम, बोरीवली, येथे सोडल्याची तपासात दिसून येताच तेथील CCTV Footage तपासण्यात आले. सदरचे तपासात बसच्या संपूर्ण रूटचा Tower Cell ID/BTS GPRS/InternetData CCTV Footage याचा कौश्यल्याने तांत्रिक तपास केला. तपासात निष्पन्न झालेल्या मोबाईल धारकाबाबत माहिती मिळवली असता त्यातील काही मोबाईल धारक हे अभिलेखावरील अटक आरोपी असल्याबाबत निष्पन्न झाले.

त्यानुसार CCTV Footage व्दारे तपासी पथकाने त्या आरोपींता माग घेऊन त्यांना सदरचे गुन्हयात दि. २९/०७/२०२१ रोजी अटक केली. त्यानंतरचे तपासात मिळालेल्या माहिती वरून इतर आरोपी हे बाहेरगांवी गेल्याचे समजून आल्याने मिळालेल्या मोबाईल नंबरवरून ब्क्त्ैक्त्ध्स्वबंजपवद उपलब्ध करून त्याआधारे आरोपीतानी भिनमल, जालोर, राजस्थान तसेच तेथुन उज्जैन, इंदौर, राज्य मध्यप्रदेश, येथे पळून जाण्याकरीता इनोव्हा मोटार नं. MH 02 JP 8616 या वाहनाचा वापर केल्याचे तपासात आढळून आले.

सदरबाबत पोलीस पथकाने मा. वरिष्ठांचे परवानगीने राज्याबाहेर राजस्थान, मध्यप्रदेश येथे जावून प्राप्त मोबाईल नंबरचा सी.डी.आर. डम डाटावरून आरोपीताचा स्थानिक पोलीस ठाणेचे सहकार्याने शोध घेतला. त्यांना अटक करून त्यांचेकडून सदरचे गुन्हयात चोरीस गेलेल्या मालमत्तेतील एकुण ४७५.०२ ग्रॅम सोने बिस्कीट तुकडयाचे स्वरूपात, एकुण किं. रू २४,२८,३३८/— मालमत्ता हस्तगत केली.

नमुद गुन्हयातील अटक आरोपी विरूध्द बृहन्मुंबईतील सुमारे १९ विविध पोलीस ठाणेस घातक अग्निशस्त्र वापरून जबरी चोरी, दरोडा, चोरी इत्यादी गुन्हयात सन २००२ पासून आत्तापर्यत प्रत्यक्ष सहभाग असल्यासंबधी गुन्हे दाखल आहेत. नमुद आरोपी मा.न्यायालयाचे आदेशान्वये अद्यापी कोठडीत आहेत.

तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळ तसेच विविध ठिकाणावरील CCTV Footage आढावा घेवून तसेच Tower Cell ID/BTS GPRS/InternetData व CDR/SDR तसेच डमडाटा या तांत्रीक बाबीचे बारकाईने निरीक्षण करून आरोपीतासंबधीची मानवी कौशल्याने सातत्याने पाठपुरावा करून माहिती काढली व सदरच्या गुन्हयात एकुण ०७ आरोपीतांना अटक केली. तसेच गुन्हयात चोरीस गेलेली मोठी रक्कमेची मालमत्ता हस्तगत केली आहे.

अंधेरी पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. विजय बेळणे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | श्री. अजय कुलकर्णी | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. गणेश पिसाळ | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | श्री. दिगंबर पगार | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह.क्र. ३०७३६ | श्री. राजेश लाड | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.ह.क्र. ६३२९ | श्री. शिवाजी संख्ये | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.ना.क्र. ०६१५३६ | श्री. मिलींद घरत | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्र. ०७१०१९ | श्री. अविनाश जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.शि.क्र. ०७१४७६ | श्री. दत्तात्रय बाबर | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र. १३०४६३ | श्री. विजय मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र. ११३१३६ | श्री. अविनाश कापसे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र. ०८९७७ | श्री. मंगेश बर्गे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.क्र. ०६०३५८ | श्री. प्रविण जाधव | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र. ०७१३०१ | श्री. सागर सोनजे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र. ०७०७२६ | श्री. विठठल राठोड | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. ०७१०४३ | श्री. सुरेश चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. १३०२८६ | श्री. केतन पाटील | प्रशस्तीपत्रक |

## (२) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट—२०२१

| | | |
|---|---|---|
| ०२ | सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग, गुन्हे शाखा, मुंबई | गु.र.क्र. १७/२१ कलम ४२०,४६५,४६, ४७१,३४, १२०(ब) भादंवि सह कलम ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० |

—: '' इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलॉईन इंशुरन्स पॉलिसी फसवणूक करणे. '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिनांक ०२/०८/२०२१ रोजी फिर्यादी श्री. जावेद मुस्तफा अन्सारी, वय ६२ वर्षे, यांनी इसम नामे त्रिपाठी मो.क्र. ७३०३४६०२४८, मयांक अग्रवाल मो.क्र. ९७७३७४६३५२, साहिल खान मो.क्र. ९६२७०८४५१९, कुणाल अग्रवाल मो.क्र. ९२०५१९६७३९, मोहित मित्तल मो.क्र. ७४६४९३३५३६ यांनी आपापसात कट रचून संगनमताने बतावणीकरुन दिनांक ०४/०३/२०२१ रोजी ते आजपर्यतच्या इंशुरंस पॉलिस पैसे भरण्याच्या बहाण्याने त्यांचे बॅक अकाउट मधून एकुण रक्कम रुपय ७४,५५,६८३/— इतकी रक्कम इतरत्र खात्यात वळवून फसवणूक केली म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. जावेद मुस्तफा अन्सारी, वय — ६२ वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | इंटरनेटच्या माध्यमातून खात्यातील रुपये ७४,५५,६८३/— |
| हस्तगत माल | | एकुण रुपये ७४,५५,६८३/— |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) प्रसुन्न कुमार शंभुलाल सिन्हा वय २१ वर्षे<br>२) हर्षित श्रीकिशन छिक्कारा वय २१ वर्षे<br>३) अदनान नासिर खान वय २० वर्षे<br>४) सौरभ कन्हैयालाल वय १९ वर्षे<br>५) पंकज महादेव शहा, वय ३२ वर्षे<br>६) मोहित सतिश मित्तल, वय २१ वर्षे<br>आरोपी क्र ०१ ते ०४ दिनांक १०/०८/२०२१<br>आरोपी क्र ०५ ते ०६ दिनांक ११/०८/२०२१ |

तपास कौशल्य :— कोविड — २०१९ च्या महामारीच्या पार्श्वभुमीवर सर्वसामान्य जनतेमध्ये स्वत:चे व कुटुंबियांचे आरोग्य व जीवित याबददल प्रचंड चिंता निर्माण झालेली आहे. याअनुषंगाने स्वत:चे व कुटुंबाचे भविष्य सुरक्षित व्हावे म्हणुन विमा कवच उपलब्ध असावे यासाठी लोक प्रयत्नशील आहेत. याच परिस्थितीचा व लोकांच्या मानसिकतेचा गैरफायदा घेवुन सायबर गुन्हेगार लोकांना फोनव्दारे संपर्क साधुन त्यांना विम्यासंबंधी नव नवीन युक्त्या वापरून पैश्यांची फसवणुक करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

अशाच प्रकारचा गुन्हा दिनांक ०२/०८/२०२१ रोजी नोंद करुन मा. पोलीस उप आयुक्त, सायबर विंग, गुन्हे शाखा डॉ. रश्मी करंदीकर, मा. सपोआ श्री. नितीन जाधव यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे तपास अधिकारी प्रपोनि संजय गोविलकर, सहायक तपासी अधिकारी सपोनि प्रविण मोहिते, सपोनि अमित उतेकर यांचे एक पथक तयार करण्यात आले. सपोनि प्रविण मोहिते, सपोनि अमित उतेकर यांनी फिर्य्रादी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे गुन्हयाचा उकल होणेकरीता मोबाईल फोन, बॅक खाते व इतर माहिती प्राप्त केली. नमूद माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन नमुद गुन्हा करणारे आरोपीच्या संभाव्य ठिकाणे हे दिल्ली व नोएडा, उत्तर प्रदेश येथे असल्याची माहिती तपासाअंर्तगत निष्पन्न केली.

नमुद गुन्हयाच्या तपासाकरीता मध्य विभाग, सायबर पोलीस ठाणेचे अधिकारी पथकासह दिल्ली येथे जावून पाहीजे आरोपी हे नजफगढ, धर्मपुरा कॉलनी, न्यु दिल्ली येथे असल्याचे प्राथमिक माहितीचे आधारे निष्पन्न केले. तसेच नमुद गुन्हयातील बेनीफिशरीचे बॅक खात्यामधील रक्कम इतर खात्यामध्ये वळती झाली असल्याने त्याबाबत अधिक माहिती प्राप्त केली व बॅक मार्फत प्राप्त आधार कार्ड वरील पत्ता आणि मिळालेले लोकेशन हे दोन वेगवेगळी ठिकाणे होती. त्यामुळे आरोपी चा प्राप्त आधार कार्डावरील पत्ता पडताळण्यात आला असता आरोपी त्याचे कुटुंबासह ५ ते ७ वर्षा पूर्वी नमूद पत्यावर भाड्याने राहत होता, त्या नंतर ते कोठे गेला हे निश्चित माहीत प्राप्त झाली नाही परंतु त्याचे वडीलांनी एक मेडीकलचे स्टोर नजफगढ परिसरात उघडले असल्याची जुजबी माहीती प्राप्त झाली.

नमुद माहितीच्या आधारे सपोनि मोहिते यांनी तांत्रिक तपास संपल्यानंतर पोलीस खात्यातील अनुभव व पारंपारीक तपासाच्या आधारे कोणालाही संशय येणार नाही याची काळजी घेवून स्वत:चे मोबाईलमधील मेडीकल प्रिसक्रिप्शन दाखवून नजफगढ परिसरातील साधारण २५–३० मेडीकल स्टोरमध्ये स्वत: पाहिजे आरोपीचा शोध घेतला. सदरवेळी एका मेडीकल मध्ये पोहिजे आरोपीचे नाव घेवून आपण इकडचेच असल्याचे भासवून इसम नामे प्रसुन मेडकल मध्ये नाही का याबाबत चौकशी केली. तेव्हा मेडीकलमधील इसमांने प्रसुन्न हा आतमध्ये असल्याचे सांगितले. तात्काळ पाहिजे आरोपी प्रसुन्न याला पोलीस पथकाचे मदतीने ताब्यात घेतले त्याच्याकडे अधिक तपासकरुन त्याचा मित्र हर्षित छिक्कारा, याला सुध्दा ताब्यात घेतले.

वर नमुद ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही आरोपीकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांचा गुन्हयामधील सहभाग असल्याचे कबुल केले. आणि त्यांचे इतर साथिदारांबाबत माहिती दिली. इतर आरोपी हे काम करीत असलेल्या ऑफिस मोतीनगर, नवी दिल्ली च्या पत्यावर पोलीस पथकांने धाव घेतली परंतु त्यांचे ऑफिस हे संध्याकाळी बरोबर ६ वाजता बंद होत असल्याने व पोलीस पथकाला सदर ठिकाणी पोहोचण्यास १५ मिनिटाचा उशिर झाला. त्यावेळी तात्काळ तांत्रिक मदत घेवून पाहिजे आरोपीची माहिती घेतली असता पाहिजे आरोपी हा आजूबाजुच्या परिसरातच असल्याची माहिती मिळून आली. ताब्यात असलेल्या आरोपीसह आजुबाजुच्या बस स्टॉप, मेट्रो रेल्वे स्टेशन, पान टपरी, हॉटेल चहा दुकाने इत्यादी परिसरात ठिकाणी शोध घेतला असता एका ठिकाणी पाहिजे आरोपी दिसून आला. तात्काळ पोलीस पथकांने क्षणाचाही विलंब न लावता दोन आरोपींना घेराव घालून ताब्यात घेतले. अशा प्रकारे एकुण ०४ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. दुसऱ्या दिवशी टान्झिट रिमांड आणि अजुन आरोपी पकडण्यासाठी पुन्हा दोन पथके तयार करण्यात आली. एक पथक मुख्य तपासी अधिकारी श्री संजय गोविलकर तसेच सपोनि मोहिते व पथक यांनी अटक ०४ आरोपींचे टान्झिाट रिमांड प्राप्त करून त्याचवेळी पो.नि. संजय गोविलकर यांनी दुसऱ्या पथकातील सपोनि उतेकर, पोउनि कांबळे व स्टाफ यांच्या सह मोतीनगर परिसरात सापळा लावून इतर दोन आरोपींना ताब्यात घेतले. व त्यांचा टान्झिट रिमांड प्राप्त केले.

तपासी अधिकारी प्रपोनि संजय गोविलकर, यांनी आरोपींना ताब्यात घेऊन मुंबई येथे मा. न्यायालया समक्ष हजर केले व पोलीस कोठडी दरम्यान तपास करून सदर गुन्हयातील मुख्य आरोपी अदनान खान (मास्टर माईड) व त्याचे साथिदार यांचेकडून फसवणूक केलेली एकुण रक्कम ७४,५५,६८३/– रुपये हस्तगत केली.

सदर तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक व मानवी कोशल्याने सातत्यपुर्वक तपास करून नमुद गुन्हयातील एकून ०६ आरोपींना त्यातील मास्टर माईडसह दिल्ली येथे जाऊन अटक केली व गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील चोरीस गेलाला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मध्य विभाग, सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई. तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उप आयुक्त | डॉ. रश्मी करंदीकर | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्री नितीन जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री संजय गोविलकर (मुख्य तपासी अधिकारी) | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री प्रविण मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री अमित उतेकर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | श्री अमर कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस नाईक क्र. ९८०५५६ | श्री संदीपान खर्जे, | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पोलीस नाईक क्र.०३०८७६ | श्री अभिजीत गोंजारी, | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पोलीस शिपाई क्र.०६०७५९ | श्री नंदकिशोर महाजन, | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस शिपाई क्र. ११२९४९ | श्री दिपक पाटील, | प्रशस्तीपत्रक |